मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. ..........
दिनांक ....../20....

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प. ... मा.अ.
आवक क्र. 30/2020-21
दिनांक 20/10/2020

# नमुना नं. १

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ (अधिनियम क्रं.२२ सन २००५)

## कलम ६ (१) प्रमाणे करावयाचा अर्जाचा नमुना




प्रति,

जनमाहिती अधिकारी साहेब,
नगरसचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

१) अर्जदारांचे संपूर्ण नांव : कोनापुरे इरबा मल्लाजी

२) संपुर्ण पत्ता : शॉप नं. ०३, क्रिस्टल पेपर, जवळ जुना पेट्रोल पंप, मिरानगर फेस-२, मिरारोड (पू.) ता. जि. ठाणे - 401107.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील

(१) माहितीचा विषय : ① मुख्य अग्निशामक अधिकारी पद भरणे बाबत विषयपत्रिका (गोषवारा) ठराव मंजूर यांच्या छायांकित सत्यप्रत मिळण्यासाठी.

आजपर्यंत मुख्य अग्निशामक अधिकारी यांच्याबाबत असलेले प्रोसिडिंग, विषयपत्रिका (गोषवारा), मंजूर केलेल्या ठरावाच्या सत्यप्रत मिळण्यासाठी.

(२) माहिती संबंधील कालावधी : ---------- ३० दिवस किंवा ----------

(३) आवश्यक असलेले :
माहितीचे वर्णन / तपशील : मुख्य अग्निशामक अधिकारी ची पद भरणे बाबत विषयपत्रिका (गोषवारा) मंजूर ठराव यांच्या छायांकित सत्यप्रत मिळण्यासाठी.

(४) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक किंवा तसे : व्यक्तीशः

(५) टपालाद्वारे असेल त्या बाबतीत साधे पोस्ट नोंदणी डाक शिघ्र पोस्ट : ----

(४) अर्जदार दारिद्रय रेषे खाली आहे काय ? : ----

(असल्यास त्याच्या पुराव्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.)

अर्जदाराची स्वाक्षरी [signature]

ठिकाण : भाईंदर

नांव : कोनापुरे इरबा

दिनांक : 21/10/2020

पत्ता : ----

मो.नं. 8308384001.

टीप :- वरील नमुन्याचा अर्ज केंव्हा करावयाचा

१) जेंव्हा कोणत्याही कार्यालयातून (राज्य/केंद्र) प्रथमच माहिती मिळावयाची असेल.

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./३० /२०२० दिनांक :- ०५ /११ /२०२०

प्रति,

श्री. कोनापुरे इरबा मष्णाजी,
शॉप नं. ०३, क्रिस्ट्रल टॉवर जवळ,
जुना पेट्रोल पंप, मिता नगर, फेस २,
मिरारोड (पूर्व), ४०११०७

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरणेबाबत विषयपत्रिका (गोषवारा), ठराव यांच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) आपणांकडील दि. २७/१०/२०२० रोजीचा महिती अधिकारातील अर्ज.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./30/2020, दि. 03/11/2020

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरणेबाबत विषयपत्रिका (गोषवारा), ठराव व इतिवृतांत यांच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांचा तपशिल, संदर्भित पत्र 02 मध्ये नमुद करुन, उक्त कागदपत्रांसाठी एकुण 22 पानांकरिता रक्कम रुपये 44/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस मात्र) इतके शुल्क महानगरपालि/का फंडात भरणा करणेबाबत कळविले होते. आपण सदर शुल्क रुपये 44/-, पावती क्र. 150512 अन्वये दि. 05/11/2020 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस संदर्भित पत्र 02 मध्ये नमुद कागदपत्रांच्या सत्यप्रती या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत. (एकूण पाने 22)

सदर माहिती उक्त प्रकरणी नगरसचिव विभागात उपलब्ध असलेल्या मुळनस्तीवरुन देण्यात आलेली असून, दिलेल्या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

०५/११/२०

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

माहिती मिळाली

पावती क्र. १५०५१२ = ४४/-
दि. ०५/११/२०

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./30 /२०२० दिनांक :- 03 /11/२०२०

प्रति,
श्री. कोनापुरे इरबा मष्णाजी,
शॉप नं. ०३, क्रिस्ट्रल टॉवर जवळ,
जुना पेट्रोल पंप, मिता नगर, फेस २,
मिरारोड (पूर्व), ४०११०७

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरणेबाबत विषयपत्रिका (गोषवारा), ठराव यांच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. २७/१०/२०२० रोजीचा महिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरणेबाबत विषयपत्रिका (गोषवारा), ठराव व इतिवृतांत यांच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरणेबाबत मा. महासभेमध्ये पारित झालेले ठराव, गोषवारे व इतिवृत्तांत, सभा सुचना व विषयपत्रिकेच्या साक्षांकित प्रती खालीलप्रमाणे आपणांस उपलब्ध करुन देत आहोत.

| अ.क्र. | सभा दिनांक व प्रकरण क्रमांक | तपशिल | एकुण पाने |
|---|---|---|---|
| १ | मा. महासभा दि. १८/०१/२०११, प्रकरण क्र. ९२ | सभा सुचना व विषयपत्रिका | ०२ |
| | | गोषवारा | ०२ |
| | | ठराव | ०२ |
| | | इतिवृत्तांत | १० |
| २ | मा. महासभा दि. १८/०७/२०१८, प्रकरण क्र. ३४ | विषयपत्रिका | ०२ |
| | | ठराव | ०१ |
| | | इतिवृत्तांत | ०३ |
| एकुण | | | २२ |

उक्त कागदपत्रांसाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये २/- याप्रमाणे एकूण २२ पानांकरिता रुपये ४४/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- ०७/०१/२०११.**

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- १०, दिनांक ०७/०१/२०११.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. १८/०१/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १०, दि. ०७/०१/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक १०, दि. ०७/०१/२०११ सोबतची विषय पत्रिका**
**सभा मंगळवार दि. १८/०१/२०११**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| — | **प्रश्नोत्तरे** – |
| — | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ८३ | दि. २०/०३/२०१० व दि. ३१/०३/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| — | **सर्व निवडणुका** - |
| — | **सर्व नियुक्त्या** - |
| — | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| — | **विनंती अर्ज** - निरंक |
| — | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – |
| ८४ | अस्थायी बालवाडी सेविकांना मानधनात वाढ करणेबाबात विचार विनिमय करणे. (दि. १८/१२/२०१० रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समीती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०६) |
| — | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| — | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** |
| ८५ | सुर्या धरणातून मिरा भाईंदर शहरासाठी १०० द.ल.लि. प्रती दिन पाणी आरक्षणासाठी जलसंपदा विभागाच्या इरादापत्रात नमूद अटींची पूर्तता करुन जलसंपदा विभागाशी करारनामा करणेबाबत. |
| ८६ | निलंबित (प्रभाग क्षेत्रिय अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. ३ श्री. संजय लक्ष्मण दोंदे यांचे निलंबन कायम करणे. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७२) |
| ८७ | महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे निलंबनाबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७३) |
| ८८ | विकास योजनेतील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या शाळा आरक्षणाच्या जागा विकसित करणेकरीता धोरण ठरविणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७६) |
| ८९ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दुय्यम निबंधक कार्यालयासाठी भाड्याने जागा उपलब्ध करून देण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७७) |
| ९० | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन, आरोग्य तसेच प्रशासकीय विभागातील सरळसेवेने नियुक्तीबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७८) |
| ९१ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील पदावर पदोन्नतीने दिलेल्या नियुक्तीबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७९) |
| ९२ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्नीशमन विभागातील मुख्य अग्नीशमन अधिकारी हे पद संचालक अग्नीशमन सुरक्षा सल्लगार, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्रतिनियुक्तीवर घेणेबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८०) |
| ९३ | सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकाम क्षेत्रासाठी, बगीच्यासाठी तसेच रस्ते धुण्यासाठी इत्यादी कारणासाठी बंधनकारक करणेबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८१) |
| ९४ | मौजे महाजनवाडी येथील सि.स.नं./सर्व्हे क्र./हिस्सा क्र. १०७/१ पै, १ पै, १०८/१,२,३, १०९/२३,२४,२७,२८, ११०/५ पै. या जागेतील ॲमिनिटी ओपन स्पेसमधील मंजूर शाळा इमारतीचे भाडे निश्चित करण्यास मान्यता देणे. (फेरसादर) |
| ९५ | घनकचरा व्यवस्थापन व हातळणी नियम २००० अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणेच्या कामाबाबत. |
| ९६ | महानगरपालिकेच्या अंशतः ताब्यात आलेल्या आरक्षणाचा विकास करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८२) |
| ९७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बगीचा, क्रिडांगण आरक्षणे विकसित करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (फेरसादर) (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७१) |
| ९८ | भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वेमार्ग छेदून टाकावयाच्या कामाबाबत. |
| ९९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा प्रकल्पासाठी पर्यायी जागा उपलब्ध करणेबाबतचा माहनगरपालिकेचा दि. २९/०६/१० रोजी पारीत केलेला ठराव क्र. १३ च्या निलंबनाच्या निर्णयाबाबत शासनाकडे अभिवेदन करण्यासाठी निर्णय घेणेबाबत. |
| १०० | आर. सी. एच फेज-२ अंतर्गत मंजूर आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांचे पदनिर्मितीबाबत. |
| १०१ | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत. |
| — | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| — | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत दिल्यान आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०७ जानेवारी २०११

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/०१/२०११

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ९२:- **मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद संचालक अग्निशमन सुरक्षा सल्लागार, महाराष्ट्र राज्य यांचेकडुन प्रतिनियुक्तीवर घेणेबाबत...**

मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी हे एकच पद मंजुर असुन ते रिक्त आहे. सहा.अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत श्री.क्लासो फर्नांडिस यांना प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा पदभार देण्यांत आलेला आहे. शासनाने तयार केलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियमास अनुसरुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने स्वतःचे सेवा प्रवेश नियम प्रारुप स्वरुपात तयार करुन त्यास मा.महासभा ठराव क्र.४० दि.१०/१०/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर नियम हरकती / सुचनांसाठी प्रसिध्द करण्यांत आले असुन प्राप्त हरकती सुचनांचे अनुषंगाने अंतिम सेवा प्रवेश नियमास मंजुरी घेण्याबाबत मा.महासभेपुढे विषय ठेवण्यांत आलेला आहे.

सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (५) (ख) अन्वये एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यांत येईल तथापी विशिष्ठ अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल अशी तरतुद आहे. महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/सा.प्र./११८/२००९-१० दि.१५/०७/२००९ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडीस (सहा.अग्निशमन अधिकारी) यांना पदोन्नती देणेबाबत प्रस्ताव मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे कडे पाठविण्यांत आला होता. श्री.क्लासो फर्नांडीस हे मुख्य अग्निशमन पदासाठी महानगरपालिका सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणीक व तांत्रिक अर्हता पूर्ण करीत असल्याने त्यास मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून दि.१७/०८/२००९ चे पत्रानुसार पदोन्नती देण्यांची शिफारस मान्य करण्यांत आली आहे.

श्री.क्लासो फर्नांडीस (सहा.अग्निशमन अधिकारी) या पदावर कार्यरत असुन दि.२५/०१/२०१० पासुन खाजगी डॉक्टरांचे सल्ल्यानुसार स्लिप डिस्क या आजाराने आजारी असल्याने वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार दि.१५/०९/२०१० पर्यंत वैद्यकिय रजेवर होते. श्री.क्लासो फर्नांडीस (सहा.अग्निशमन अधिकारी) यांनी दि.१७/०९/२०१० रोजी मा.जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील ते आजारमुक्त असुन काम करण्यांस सक्षम असलेबाबतचा दाखला दिला असुन. त्यांचे अग्निशमन विभागातील कामाचे स्वरुप पहाता प्रशासनास ते आजारमुक्त असलेबाबत साशंका असल्याने आजाराबाबत मा.अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून तपासणी करुन घेण्याचे निश्चित करुन सर जे.जे. रुग्णालय समुह यांचेकडील सक्षमतेबाबतचा दाखला आणण्याच्या अटीवर दि.१७/०९/२०१० रोजीपासुन

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग

कामांवर रुजु करुन घेण्यांत आले आहे. जा.क्र.मनपा/आस्था/८२९/३५/२०१०-११ दि.१६/१०/२०१० अन्वये मा.अधिष्ठाता सर जे.जे.रुग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून श्री.क्लासो फर्नाडीस यांची वैद्यकिय तपासणी करुन ते सक्षम असल्याबाबतचा दाखला मिळणेस कळविले आहे. परंतु अद्यापपर्यंत श्री. क्लासो फर्नाडीस यांचा शारिरीक तपासणीत सक्षम असलेबाबतचा दाखला अप्राप्त आहे.

अग्निशमन विभागासाठी कामाचे स्वरुप व काम पहाता कर्मचारी शारीरीक दृष्टया काम करणेस सक्षम असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत श्री. क्लासो फर्नाडीस यांचे सक्षमतेबाबतचा अहवाल कार्यालयास प्राप्त नाही. त्यामुळे वैद्यकिय मंडळाचा सक्षमतेबाबत अहवाल प्राप्त होई पर्यंत मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने किंवा त्यांच्यामार्फत कायम स्वरुपी भरुन घेणेस प्रकरण मा. महासभेपुढे निर्णयास्तव सादर करण्यांत येत आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०२/२०११

(दि. १८/०१/२०११ ची तहकुब सभा)

३२१/२८२

**प्रकरण क्र. ९२ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद संचालक अग्निशमन सुरक्षा सल्लागर, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्रतिनियुक्तीवर घेणेबाबत..

**ठराव क्र. :- ८३**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरिता शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी हे एकच पद मंजुर असून ते रिक्त आहे. सहा. अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत श्री. क्लासो फर्नांडिस यांना प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा पदभार देण्यांत आलेला आहे. शासनाने तयार केलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियमास अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिकेने स्वतःचे सेवा प्रवेश नियम प्रारूप स्वरूपात तयार करून त्यास मा. महासभा ठराव क्र. ४० दि. १०/१०/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर नियम हरकती/सुचनांसाठी प्रसिध्द करण्यांत आले असून प्राप्त हरकती सुचनांचे अनुषंगाने अंतिम सेवा प्रवेश नियमास मंजुरी घेण्याबाबत मा. महासभेपुढे विषय ठेवण्यांत आलेला आहे.

सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (५) (ख) अन्वये एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यांत येईल तथापी विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल अशी तरतुद आहे. महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/सा.प्र./११८/२००९-१० दि. १५/०७/२००९ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांना पदोन्नती देणेबाबत प्रस्ताव मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यांत आला होता. श्री. क्लासो फर्नांडिस हे मुख्य अग्निशमन पदासाठी महानगरपालिका सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करित असल्याने त्यास मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून दि. १७/०८/२००९ चे पत्रानुसार पदोन्नती देण्याची शिफारस मान्य करण्यांत आली आहे.

श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) या पदावर कार्यरत असून दि. २५/०१/२०१० पासुन खाजगी डॉक्टरांचे सल्ल्यानुसार स्लिप डिस्क या आजाराने आजारी असल्याने वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार दि. १५/०९/२०१० पर्यंत वैद्यकिय रजेवर होते. श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांनी दि. १७/०९/२०१० रोजी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील ते आजारमुक्त असुन काम करण्यांस सक्षम असलेबाबतचा दाखला दिला असुन. त्यांचे अग्निशमन विभागातील कामाचे स्वरूप पहाता प्रशासनास ते आजारमुक्त असलेबाबत साशंका असल्याने आजाराबाबत मा. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून तपासणी करून घेण्याचे निश्चित करून सर जे.जे.रूग्णालय समुह यांचेकडील सक्षमतेबाबतचा दाखला आणण्याच्या अटीवर दि. १७/०९/२०१० रोजीपासुन कामावर रूजु करून घेण्यांत आले आहे. जा.क्र.मनपा/आस्था/८२९/३५/२०१०-११ दि. १६/१०/२०१० अन्वये मा. अधिष्ठाता सर जे.जे.रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून श्री. क्लासो फर्नांडिस यांची वैद्यकिय तपासणी करून ते सक्षम असल्याबाबतचा दाखला मिळणेस कळविले आहे. त्यानुसार श्री. क्लासो फर्नांडिस यांचा शारिरिक तपासणीत सक्षम असलेबाबतचा दि. २८/०१/२०११ रोजी दाखला प्राप्त आहे.

अग्निशमन विभागासाठी कामाचे स्वरूप व काम पहाता अधिकारी अनुभवी व उच्च शैक्षणिक पात्रता धारक असणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री. क्लासो फर्नांडिस यांचे सक्षमतेबाबत अहवाल

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालयास प्राप्त असला तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वाढते औद्योगिकरण/शहरीकरण पहाता अग्निशमन विभागातील निष्णात अनुभवी अधिकारी असणे आवश्यक आहे. अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद तातडीने भरणे आवश्यक असल्याने सदर पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने किंवा कायम स्वरूपी भरून घेणेस पुढील आवश्यक ती सर्व प्रशासकिय कार्यवाही मा. आयुक्त यांनी करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | |
| २ | वेतोस्कर राजेश शंकर | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | सुनिता कैलास पाटील | ३ | सिंह मदन उदितनारायण | |
| ४ | पाटील प्रभात प्रकाश | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ५ | सावळे निर्मला बाबुराव | ५ | पाटील शरद केशव | |
| ६ | कुरेशी याकुब ईस्माईल | ६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ७ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | ७ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ८ | शेख मुसर्रतबानु | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ९ | सपार उमा विश्वनाथ | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १० | दुबे रामनारायण सदानंद | |
| ११ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | ११ | यादव मिरादेवी रामलाल | |
| १२ | श्री. वासुदेव भास्कर मुंज | १२ | पालांडे प्रशांत भगवंतराव | निरंक |
| १३ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | १३ | पाटील उमाताई शाम | |
| १४ | शफीक अहमद सादत खान | १४ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| १५ | मर्लिन मर्विन डिसा | १५ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १६ | वैती विजया हेमचंद्र | १६ | गणेश गोपाळ शेट्टी | |
| १७ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| १८ | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | १८ | नयना गजानन म्हात्रे | |
| १९ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २० | भट दिप्ती शेखर | | | |
| २१ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २२ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २३ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| २४ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| २५ | पाटील जयंत महादेव | | | |
| २६ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| २७ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| २८ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| २९ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३० | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३१ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३२ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | | | |
| ३३ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ३४ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ३५ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ३६ | परेरा टेरी पॉल | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रं. ९२, मिरा भाईंदर महानगरपालिका अग्नीशमन विभागातील मुख्य अग्नीशमन अधिकारी हे पद संचालक अग्नीशमन सुरक्षा सल्लगार, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्रतिनियुक्तीवर घेणेबाबत. (मा. महासभा दि. २२/१२/२०१० (दि.१६/१२/२०१० ची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८०)

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरिता शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी हे एकच पद मंजुर असून ते रिक्त आहे. सहा. अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत श्री. क्लासो फर्नांडिस यांना प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा पदभार देण्यांत आलेला आहे. शासनाने तयार केलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियमास अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिकेने स्वतःचे सेवा प्रवेश नियम प्रारूप स्वरूपात तयार करून त्यास मा. महासभा ठराव क्र. ४० दि. १०/१०/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर नियम हरकती/सुचनांसाठी प्रसिध्द करण्यांत आले असून प्राप्त हरकती सुचनांचे अनुषंगाने अंतिम सेवा प्रवेश नियमास मंजुरी घेण्याबाबत मा. महासभेपुढे विषय ठेवण्यांत आलेला आहे.

सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (५) (ख) अन्वये एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यांत येईल तथापी विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल अशी तरतुद आहे. महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/सा.प्र./११८/२००९-१० दि. १५/०७/२००९ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांना पदोन्नती देणेबाबत प्रस्ताव मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यांत आला होता. श्री. क्लासो फर्नांडिस हे मुख्य अग्निशमन पदासाठी महानगरपालिका सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करित असल्याने त्यास मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून दि. १७/०८/२००९ चे पत्रानुसार पदोन्नती देण्याची शिफारस मान्य करण्यांत आली आहे.

श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) या पदावर कार्यरत असून दि. २५/०१/२०१० पासुन खाजगी डॉक्टरांचे सल्ल्यानुसार स्लिप डिस्क या आजाराने आजारी असल्याने वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार दि. १५/०९/२०१० पर्यंत वैद्यकिय रजेवर होते. श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांनी दि. १७/०९/२०१० रोजी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील ते आजारमुक्त असुन काम करण्यांस सक्षम असलेबाबतचा दाखला दिला असुन. त्यांचे अग्निशमन विभागातील कामाचे स्वरूप पहाता प्रशासनास ते आजारमुक्त असलेबाबत साशंका असल्याने आजाराबाबत मा. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून तपासणी करून घेण्याचे निश्चित करून सर जे.जे.रूग्णालय समुह यांचेकडील सक्षमतेबाबतचा दाखला आणण्याच्या अटीवर दि. १७/०९/२०१० रोजीपासुन कामावर रूजु करून घेण्यांत आले आहे. जा.क्र.मनपा/आस्था/८२९/३५/२०१०-११, दि. १६/१०/२०१० अन्वये मा. अधिष्ठाता सर जे.जे.रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून श्री. क्लासो फर्नांडिस यांची वैद्यकिय तपासणी करून ते सक्षम असल्याबाबतचा दाखला मिळणेस कळविले आहे. त्यानुसार श्री. क्लासो फर्नांडिस यांचा शारिरिक तपासणीत सक्षम असलेबाबतचा दि. २८/०१/२०११ रोजी दाखला प्राप्त आहे.

अग्निशमन विभागासाठी कामाचे स्वरूप व काम पहाता अधिकारी अनुभवी व उच्च शैक्षणिक पात्रता धारक असणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री. क्लासो फर्नांडिस यांचे सक्षमतेबाबत अहवाल कार्यालयास प्राप्त असला तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वाढते औद्योगिकरण/शहरीकरण पहाता अग्निशमन विभागातील निष्णात अनुभवी अधिकारी असणे आवश्यक आहे. अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद तातडीने भरणे आवश्यक असल्याने सदर पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने किंवा कायम स्वरूपी भरून घेणेस पुढील आवश्यक ती सर्व प्रशासकिय कार्यवाही मा. आयुक्त यांनी करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**याकुब कुरेशी :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब हा जो विषय आपण सादर केलेला आहे. प्रतिनियुक्तीवर आपण हेड ऑफ द डिपार्टमेन्ट अग्निशमन अधिकारी घ्यायचे आहेत. त्याच मुळ कारण काय. क्लासो हे सध्या अनफिट असे दिसून येतात. त्यासाठी त्यांच जोपर्यंत होत नाही तोपर्यंत प्रतिनियुक्तीवर घ्यायच. एका बाजूला आपले असे म्हणणे होते की अधिकारी मिळत नाही. म्हणून आपण टॅक्स कर्मचाऱ्याला प्रमोशन दिले. इकडे तुमच्याकडे अधिकारी आहे. परंतु तो फिट नाही. आणि फायर ऑफीसर आहे. उद्या शहरात काय झाले तर त्यांना कामावर रूजू करून का घेतले. त्यांची जे.जे.हॉस्पीटलला जी माहिती पाठवली ती आली का?

**मा. आयुक्त :-**

काल आली.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी नगरसचिव विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

माहिती आली तर त्याचे वाचन करा. साहेब, तुम्ही ही सभागृहाला माहिती द्यायला पाहिजे. तुमच्याकडे तो रिपोर्ट आलेला आहे. मा.महापौर साहेब, ज्यासाठी विषय आणलेला आहे. साहेब सभागृहात विषय आहे. आपले कर्तव्य आहे.

**मा. आयुक्त :-**

वाचून दाखवतो आता.

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय नाही. विषय येतानाच आपण सांगायला पाहिजे ठराव झाला तिकडे. आपण वाचन करा.

**गोविंद परब :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. क्लासो फर्नांडिस ह्यांना महापालिकेने जे.जे. रूग्णालयात वैद्यकिय तपासणीसाठी पाठवले होते. त्यांचे काल २८ जानेवारी २०११ रोजी कार्यालयात पत्र प्राप्त झाले की, ते फीट आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

ते फीट आहेत ना? पत्र आले त्याच्यात म्हटले आहे ना. की ते फीट आहेत. मग विषय संपला. उद्या तुम्ही गर्व्हमेन्टला पट्टी पढवाल आणि इकडे दुसरा अपॉइन्ट करणार का? त्याला मान्यतेची गरज नाही. त्याला सभेने मान्यता दिली आहे. ते अनफिट होतो. कामकाज व्यवस्थित चालाव म्हणून आयुक्तांनी प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव सादर केला. आता ते फिट आहेत. म्हणजे ह्या विषयाचा काही संबंधच नाही.

**भगवती शर्मा :-**

साहब मेरे ठराव मे फिटनेस का भी दिया है। आप पुरा ठराव पढेंगे तो आपको समझ में आयेगा। विषय के अनुस्वरुप जाकर ठराव किया है। शहर के बढते औद्योगिकरण के कारण से फायर ऑफीसर की जरुरत है। उस किसाब से ठराव किया।

**नरेंद्र मेहता :-**

क्लासो फर्नांडिसची विशेष बाब अशी आहे की, आपण महासभेने मंजूरी करून त्यांची शैक्षणिक पात्रता हे सगळे बघून गर्व्हरमेन्टला पाठवले होते की, ह्यांना करता येईल का? त्यानंतर गर्व्हमेन्टने त्यांची सगळी शैक्षणिक पात्रता तपासून त्यानंतर आदेश किंवा त्याची मान्यता झाली. मान्यता झाल्यानंतर आता प्रतिनियुक्तीवर घ्यायचा विषयच कुठे येतो. आयुक्त साहेब आपण खुलासा केला तर विषय संपून जाईल. आता तुमच्याकडे फिटचा रिपोर्ट आलेला आहे. आणि शासनाची मान्यता पण झालेली आहे की, त्यांची त्या अग्निशमन अधिकारी म्हणून नेमणूक व्हावी तरी आपल्याला वाटते का की प्रतिनियुक्तीवर घ्यायला पाहिजे किंवा सभागृहाने अजून घेऊ शकतात. कारण शासनाचा आदेश झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मेहता साहेबानी जे म्हणणे मांडले त्याच्याशी मी सहमत आहे. कारण प्रथम प्रतिनियुक्तीवर जो अधिकारी मागवणार आहोत तर शासनाकडे असा अधिकारी सक्षम आहे का? कारण माझ्या माहितीप्रमाणे श्री. क्लासो फर्नांडीस यांना वसई-विरार महानगरपालिकेने प्रभारी चार्ज दिलेला आहे. अशा महापालिकेला जर असा अधिकारी मिळत नसेल आणि आपल्याकडून जर असा अधिकारी तिकडे गेला तर आपल्याच अधिकाऱ्याला आपला प्रभारी व्हायला लागेल तर सभागृहाने यावर विचार करावा की, आता प्रतिनियुक्तीवर मागण्याची काय आवश्यकता उरलेली नाही. जर फिट आहेत तर त्यांना पदोन्नती द्यावी.

**नरेंद मेहता :-**

ऑलरेडी बॉडीने केलेले आहे. बॉडीला वेगळी मंजूरी द्यायची नाही. विषय रद्द होतो.

**शशिकांत भोईर :-**

आयुक्त साहेब त्यांच्याकडे वसई-विरार महापालिकेचा चार्ज पण आहे.

**मा. आयुक्त :-**

ज्यावेळेला त्यांच्याकडे तपासणीला पाठवल होत. त्यावेळेला त्याच्या पाठीच्या कण्यामध्ये गॅप आहे असा मेडिकल रिपोर्ट होता. त्यामुळे गॅप आहे म्हटल्यावर आम्ही त्यांना मेडिकल चेकअप करायला पाठवले. त्यांनी फिटनेसचे सर्टिफिकेट आणलेले आहे. त्यामुळे त्यावेळेलो गॅप असल्यामुळे प्रतिनियुक्तीवर घेण्याचा प्रस्ताव आम्ही दिला होता. आता प्रतिनियुक्तीवर घ्यायचे की नाही घ्यायचे हे महासभेने ठरवायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, विषय दोन प्रकारचे आहेत. रूटीनमध्ये आपण प्रतिनियुक्ती सांगतात ते बरोबर आहे. म्हणजे एखादे धनेगावे साहेबाचे पद आहे ते तुम्ही म्हटले ए.टी.पी ते घ्यायच का ते ठिक आहे. पण हे महापालिकेने मंजूर केले आणि गर्व्हनमेन्टने मान्यता दिली की त्याला ती पदोन्नती द्यावी म्हणून दोन्ही झालेले आहे. आता ती पदोन्नती रद्द करायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

आता सभागृहाने निर्णय घ्या की, पदोन्नती घ्यायचे की प्रतिनियुक्तीने घ्यायचे. वसई-विरार महापालिका आताच स्थापन झालेली आहे. त्यांची पदच मंजूर नाहीत तर पद असायचा प्रश्नच येत नाही. आपल्याकडे



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुध्दा पद मंजुरीनंतर व्यक्ति नेमली जाते. त्यांच्याकडे अग्निशमन अधिकारी हे पदच मंजूर नाही. नविन महापालिका आहे. आता हे पद मंजूर करून घेणार.

**शशिकांत भोईर :-**

आयुक्त साहेब, जरी पद नसल तरी या ठिकाणी शासनाकडे पदासाठी मागणी करावी की आम्हाला असा अधिकारी पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

शासनाकडे पद मंजुर असल्याशिवाय मागणी सुध्दा करता येत नाही. अगोदर पद मंजूर करावे लागते. पद महापालिकेकडे मंजुर असल्यानंतरच अधिकारी त्या पदावर मागवता येतो.

**शशिकांत भोईर :-**

अगोदर नगरपालिका होती तेव्हा कुठल तरी पद असेल. त्याच्या खालच्या पदावर अधिकारी मंजूर असेल की नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या अधिकाऱ्याचे पद मंजूर नाही ना. ती जी लेवल आहे. त्याचे वसई-विरारमध्ये पद मंजूर नाही. एक वर्षापूर्वी महापालिका झाली असून शासनाकडे पद मंजुरीचा प्रस्ताव गेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्यांच्याकडे अगोदर अग्निशमन विभाग होता. आपल्या जे महापालिकेमध्ये पद पाहिजे ते नसेल पण त्याच्या खालच्या दर्जाचे पद असेल.

**मा. आयुक्त :-**

वसई-विरारमध्ये ते पद नसेल तर आमच्याकडून कशाला मागितले असते. पद असेल तर भरती केली असती.

**शशिकांत भोईर :-**

ते आपल्याकडून मागवू शकतात.

**मा. आयुक्त :-**

नविन महापालिका झाल्यानंतर कोणीही मागणी करते. ज्यावेळेला त्यांच्याकडे पद असेल तर मागणी केली नसती.

**शशिकांत भोईर :-**

त्यांना प्रस्ताव मंजुरीसाठी जर आपल्या महापालिकेतील अधिकाऱ्याची आवश्यकता असेल तर ते शासनाकडून अधिकारी मागवू शकले असते. त्यांना आपल्याच महापालिकेतला अधिकारी का पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मग त्यांना आपण कळवायच की शासनाकडून मागवा. त्यांच्याकडे शासनाकडून पद मागवण्यासाठी त्यांच्या आस्थापनेवर पद मंजुर नाही. पद मंजूर असल्याशिवाय शासनाचा अधिकारी मागवता येत नाही. म्हणून त्यांनी आपल्याला विनंती केली.

**शशिकांत भोईर :-**

तो आपला प्रभारी नाही. जर कोणताही ठराव असेल. किंवा कोणताही नविन ठराव करून टॅक्स वाढवायचा असेल मग त्या प्रभारी अधिकाऱ्यांनी मंजुरी केला. तर तो ग्राह्य धरणार नाही का? जर त्यांना अग्निशमन दरामध्ये कराची वाढ करायची असेल आणि अशाप्रकारे अधिकाऱ्याने सुचवल की ह्याच्यामध्ये ह्या टक्क्याने दर वाढवण गरजेच आहे. तर त्यांनी वाढवू दिला आणि मंजूरी झाली तर अशा प्रभारी अधिकाऱ्याची सही त्याच्यावर असली तर ते मंजुर होणार नाही का.

**मा. आयुक्त :-**

मंजुर होणार ना.

**शशिकांत भोईर :-**

आपला जर अधिकारी ते मागवू शकतात तर ते लोक महाराष्ट्र शासनाकडून अधिकारी मागवू शकत होते.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब, ज्यावेळेला तुम्ही गोषवारा दिला होता. त्यावेळेला मेडिकल रिपोर्ट प्राप्त झाला नव्हता. आता मेडिकल रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. आणि प्रशासकिय अधिकाऱ्याने सांगितल्याप्रमाणे ही इज फीट फॉर द ड्युटी. वसई-विरार महापालिका ही नक्कीच मिरा भाईदरपेक्षा मोठी आहे. इंडस्ट्रिलायजेशन सुध्दा जास्त आहे. तिथे जर ते काम करू शकत असतील ते कॅपेबल आहेत तर मिरा-भाईंदर शहरासाठी करू शकणार नाही?

**मा. आयुक्त :-**

आता करू शकत नाही असा प्रश्नच नाही. कारण आता त्यांचे फिटनेस सर्टिफिकेट आल आहे. त्याचा सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे.

माहिती अधिकार ... अंतर्गत
देण्यात ... सत्यप्रत



मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

क्लासो संदर्भात शासनाच एक पत्र आहे. ज्यावेळी आपण हे पद सरळ सेवेने भरती केली. त्यावेळी आपल्याला थांबविण्याच आदेश देण्यात आले होते. आणि सांगितले होती की तुमच्याकडे त्यांनाच घ्याव. दि. १७/०१/२००९ चे याच संदर्भात पत्र आहे.

उपरोक्त पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अग्निशमन सेवेतील श्री. क्लासो फर्नांडिस सहाय्यक अग्निशमन अधिकारी उपमुख्य अग्निशमन अधिकारी वेतनश्रेणी ६५००-१०५०० ह्यांनी रू. १०० चा स्टॅम्प पेपरवर शासनाच्या निर्णयानुसार अग्निशमन सेवेतील शासकिय सेवेत समाविष्ट होण्याची सहमती दाखवली आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी ह्या पदासाठी या कार्यालयाने प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करतात. आतापर्यंत त्यांनी सुमारे ९ वर्ष सहा.अग्निशमन अधिकारी, उपमुख्य अधिकारी या पदावर काम केले असल्याने त्यांना मुख्य अग्निशमन अधिकारी मिरा भाईंदर मनपा. पदावर पदोन्नती देण्यात शिफारस मान्य करण्यात येत आहे. ते गर्व्हमेन्टचे पत्र आहे. आता तुम्ही याच्यावर पण ठरवणार की, त्यांना द्यायचे नाही. प्रतिनियुक्तीवर घ्यायचे का आणि आयुक्तांनी प्रस्ताव सादर केला आहे. तो एकदम स्पष्ट आहे की त्यांचा रिपोर्ट येत नाही म्हणून तात्पुरते प्रतिनियुक्तीवर घ्यायच. आता तो रिपोर्ट आला मग विषय संपला.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, त्यांच जर २८ तारखेला फिटनेसच सर्टिफिकेट मिळाल आणि सभा एक तारखेला आहे तर प्रशासनाने ते पत्र सर्व सदस्यांना दिल असत. की हे फिटनेस सर्टिफिकेट आहे विषय रद्द करावा. महापौरानी डिसीजन घेतल असत आणि ही चर्चा झाली नसती. विषय जाहिर झाला. विषयावर ठराव मांजला आणि आता आपण सांगता २८ ला पत्र आले त्यामुळे हा टेक्निकल प्रॉब्लेम झाला.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब गर्व्हनमेन्टची दोन-दोन पत्र आहेत. मग आपल्या अधिकाऱ्यांने आपल्या विरोधात जायचे का? एका बाजूला आपण बोलतो स्थानिकला प्राधान्य द्या. आपल्या लोकांना पदोन्नती द्या. आणि एका बाजूला बोलतो प्रतिनियुक्तीवर घ्या. मेडिकल रिपोर्ट फिट आला आणि तुम्ही ते रद्द केल्याशिवाय तुम्हाला ते घेता येत नाही ते ही सांगा. तुम्हाला तो ठराव रद्द करायला लागेल. तुम्हाला रद्द करायचा नसेल. महापौर साहेब, तुम्हाला अस वाटत असेल की ह्याच्यामध्ये टेक्निकल आहे. तर हा विषय पुढच्या महासभेपुढे आपण सादर करा.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब, आम्ही ठराव केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, मागचा ठराव रद्द केल्याशिवाय नविन ठराव करायचा का? आणि विषय काय होता. जे.जे. मधून सर्टिफिकेट आले नाही किंवा ते मेडिकल फिट नाही. आता फिट आल्यानंतर तुम्ही सांगाल कस काय होईल. निवड समितीने क्लियर करावे. तरी आपल्याला वाटत असेल तर पुढच्या मिटींगला विषय घ्या. आम्ही बोलत नाही. की त्यांना आजच घ्या किंवा प्रतिनियुक्तीवर घेऊ नका. पुढच्या मिटींगमध्ये टेक्नीकल बाब विचारात घ्या. प्रत्येक विषयात ठराव मांडायची आम्हाला आवश्यकता नाही.

**शशिकांत भोईर :-**

नरेंद्र मेहतानी जी सुचना मांडली आहे. तर पुढच्या मिटींगला घ्या. ह्याचे फिटनेस सर्टिफिकेट असेल तर सविस्तर गोषवारा येऊ द्या.

**नरेंद्र मेहता :-**

आपण ऑडिटर, अधिकारी आणि गर्व्हनमेन्टकडून चेक करा आणि पुढच्या मिटींगला विषय घ्या.

**मा. महापौर :-**

ठरावामध्ये अगोदर दिलेल आहे तर काय करणार.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव मंजूर झालेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

गोषवाऱ्यानुसार आहे ना ते. त्याच सर्टिफिकेट द्या आणि गोषवाऱ्यात नमुद करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सुचक जे आहेत ते आपला ठराव मागे घेणार नाहीत. ते घेत नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

विषय तसा नाही. विषय असा आहे की मागचा ठराव रद्द केल्याशिवाय.........

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

ठराव मताला टाका.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

आपलेच अधिकारी आपल्याच विरोधात बर वाटते का? गर्व्हनमेन्टचे दोन-दोन आदेश आहेत. गर्व्हनमेन्टला पण तुम्ही गृहित धरत नाही.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे. पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव मांडायचा मतदान घ्यायच म्हणजे विषय संपला का? कोणी कोर्टात गेले तर महापालिकेचा पण खर्च होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आम्हाला ठराव मांडायचा आहे. आता रिपोर्ट आला तर आमच्या ठरावामध्ये सुधारणा करतो. त्यासाठी आम्हाला दोन मिनिट द्या.

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. आयुक्त :-**

सर्टिफिकेट मधली खालची लाईन वाचा म्हटल्यावर तुम्हाला माहित होत ना. म्हणजे आता माहिती झाल अस नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आज सकाळी माहित पडल की, आपल्याकडे अस पत्र प्राप्त झालेले आहे. ते खर म्हणजे महापालिकेने द्यायला पाहिजे होते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्हाला सकाळी तरी माहित पडल. आम्हाला आता माहित पडते.

**नरेंद्र मेहता :-**

तो तुम्ही विचार करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठराव झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या पालिका क्षेत्रामध्ये राहणारा आणि अग्निशमन दल हा खरोखर सक्षम आहे. ह्या विभागाची आपल्याला आवश्यकता आहे. आणि एका बाजूला आपल्या स्थानिकाला प्राधान्य देऊन पदोन्नती द्यावी अशी मी आग्रहाची विनंती करतो ह्याचे दोन ठराव करू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरिता शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी हे एकच पद मंजुर असून ते रिक्त आहे. सहा. अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत श्री. क्लासो फर्नांडिस यांना प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा पदभार देण्यांत आलेला आहे. शासनाने तयार केलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियमास अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिकेने स्वतःचे सेवा प्रवेश नियम प्रारूप स्वरूपात तयार करून त्यास मा. महासभा ठराव क्र. ४० दि. १०/१०/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर नियम हरकती/सुचनांसाठी प्रसिध्द करण्यांत आले असून प्राप्त हरकती सुचनांचे अनुषंगाने अंतिम सेवा प्रवेश नियमास मंजुरी घेण्याबाबत मा. महासभेपुढे विषय ठेवण्यांत आलेला आहे.

सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (५) (ख) अन्वये एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यांत येईल तथापी विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल अशी तरतुद आहे. महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/सा.प्र./११८/२००९-१० दि. १५/०७/२००९ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांना पदोन्नती देणेबाबत प्रस्ताव मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यांत आला होता. श्री. क्लासो फर्नांडिस हे मुख्य अग्निशमन पदासाठी महानगरपालिका सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करित असल्याने त्यास मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणिबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून दि. १७/०८/२००९ चे पत्रानुसार पदोन्नती देण्याची शिफारस मान्य करण्यांत आली आहे.

श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) या पदावर कार्यरत असून दि. २५/०१/२०१० पासुन खाजगी डॉक्टरांचे सल्ल्यानुसार स्लिप डिस्क या आजाराने आजारी असल्याने वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार दि. १५/०९/२०१० पर्यंत वैद्यकिय रजेवर होते. श्री. क्लासो फर्नांडिस (सहा. अग्निशमन अधिकारी) यांनी दि. १७/०९/२०१० रोजी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील ते आजारमुक्त असुन काम करण्यांस सक्षम असलेबाबतचा दाखला दिला असुन. त्यांचे अग्निशमन विभागातील कामाचे स्वरूप पहाता प्रशासनास ते आजारमुक्त असलेबाबत साशंका असल्याने आजाराबाबत मा. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून तपासणी करून घेण्याचे निश्चित करून सर जे.जे.रूग्णालय समुह यांचेकडील



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

सक्षमतेबाबतचा दाखला आणण्याच्या अटीवर दि. १७/०९/२०१० रोजीपासुन कामावर रूजु करून घेण्यांत आले आहे. जा.क्र.मनपा/आस्था/८२९/३५/२०१०-११ दि. १६/१०/२०१० अन्वये मा. अधिष्ठाता सर जे.जे.रूग्णालय समुह, भायखळा, मुंबई यांचेकडून श्री. क्लासो फर्नांडिस यांची वैद्यकिय तपासणी करून ते सक्षम असल्याबाबतचा दाखला मिळणेस कळविले आहे. परंतु अद्यापपर्यंत श्री. क्लासो फर्नांडिस यांचा शारिरिक तपासणीत सक्षम असलेबाबतचा दि. २८/०१/२०११ रोजी दाखला अप्राप्त आहे.

